17/9/2025

# भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता

एड. राजेंद्र कुमार काळे

***धर्म हा श्रद्धेचा विषय, पण राष्ट्राचा मार्गदर्शक तर्कच!***

भारतीय राज्यघटनेला ‘सर्व धर्मीयांची घटना’, किंबहुना ‘सर्व भारतीयांचा पवित्र ग्रंथ’ अशी संज्ञा दिल्या गेली आहे (संदर्भ: पुणे बार अँड बेंच, वर्ष १, अंक ३, दिनांक २१/९/२०२५, एड. सुधारकरराव आव्हाड). कारण, ही घटना भारतातील सर्व धर्म—तसेच नास्तिकताही—एकीकडे ठेवून, प्रत्येक नागरिकाला समानरीत्या लागू होईल अशी एक मूलभूत व्यवस्था आहे. सैन्य भाषेत म्हणलेतर भारतीय राज्यघटना आपल्या राष्ट्रासाठी एखाद्या क्षेपणास्त्राच्या मार्गदर्शक प्रणाली (गाईडन्स सिस्टीम) सारखी आहे. जशी क्षेपणास्त्राची ‘गाईडन्स सिस्टीम’ त्याला अचूकपणे लक्ष्यावर पोहोचवते, तसेच राज्यघटना भारताला न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या आधारावर सर्वांगीण विकासाच्या ध्येयापर्यंत नेण्यास सक्षम आहे. मार्गात कितीही अडथळे आले, तरी राज्यघटना आपल्याला पुन्हा योग्य दिशेला वळवते. राज्यघटनेचे योग्यरित्या पालन झाले नाही, तर राष्ट्र दिशाहीन होईल.

या मार्गदर्शक व्यवस्थेत अनेक संवेदनशील ‘पॅरामिटर्स’ आहेत, त्यांपैकी धर्मनिरपेक्षता हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. क्षेपणास्त्राला लक्ष्यापर्यंत पोहोचवण्यासाठी जशी उंची, वेग, कोन यांसारखी विविध मोजमापे आवश्यक असतात, तशीच राष्ट्राची वाटचाल योग्य मार्गाने व्हावी यासाठी धर्मनिरपेक्षतेची भक्कम हमी आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षतेचा पाया मजबूत असेल, तरच भारत न्याय, समता आणि बंधुता यांवर आधारित विकासाच्या योग्य मार्गावर ठामपणे पुढे जाईल.

या विचारात एक मोठी अडचण सुद्धा आहे. प्यू स्टडी (२०२१) नुसार १००% भारतीय नागरीक धार्मिक (हिंदू/मुस्लिम: ९४%, इतर: ६%) असता अनेकांच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो, कि ‘धर्म’ एकीकडे ठेवून देश कसा चालणार? एक नवीन ‘तर्क’ दिला जातो कि “मूळ घटनेत ‘धर्मनिरपेक्ष’ शब्द

नव्हता, तो तर १९७६ मध्ये आला!" खरं तर मा. सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा स्पष्ट केले आहे, कि आपल्या राज्यघटनेला एक मूलभूत रचना (basic structure) आहे, व त्याचा धर्मनिरपेक्ष स्वरूप सुरूपासूनच त्या मूलभूत रचनेचा अविभाज्य भाग आहे. धर्मनिरपेक्षता काढली तर संविधान राहणार नाही, व संविधान (राष्ट्राची आत्मा) राहिला नाही तर राष्ट्र सुद्धा राहणार नाही. तरी घटनेच्या संदर्भात *धर्मनिरपेक्षता* म्हणजे नेमकं काय? धर्मनिरपेक्ष असणे म्हणजे नेमके काय? आपला प्रगतीचा क्षेपणास्त्र दिशाहीन होत आहे का? याचा विचार करणे आवश्यक आहे.

धर्मनिरपेक्ष असणे म्हणजे मूलतः तर्कनिष्ठ असणे, किंवा दैनंदिन जीवनात तार्किक तत्त्वांनी मार्गदर्शित होणे. पण सामान्य भाषेत "धर्मनिरपेक्षता" या शब्दाला नकारात्मक छटा प्राप्त झाली आहे: जणू धार्मिक श्रद्धांच्या विरोधात असणे. ही मर्यादित व्याख्या कदाचित इंग्रजी शब्दकोशातील *secular* या शब्दाच्या अर्थाच्या चुकीच्या वाचनातून आली असावी: "धर्माशी किंवा अध्यात्माशी संबंधित नसलेले" किंवा "धार्मिक नियमांच्या अधीन नसलेले; मठीय जीवनाशी संबंधित नसलेले." पण लक्ष देऊन ही परिभाषा वाचली तर या शब्दकोशीय अर्थांवरूनसुद्धा दिसून येतं की धर्मनिरपेक्ष घटना/ शासन/ शासन-व्यवस्था धर्माच्या बाबतीत स्वतःला गुंतवत नाही. धर्मनिरपेक्षतेची ही व्याख्या म्हणजे, धर्म-राज्य विलगीकरण (चर्च-स्टेट सेपरशन). म्हणजे, धर्माला (कोणत्याही धर्माला) राजकारणातून (सरकार आणि शासनप्रणालीपासून) बाहेर ठेवणे. भारतीय राज्यघटना आणि सगळे कायदे याच अर्थाने धर्मनिरपेक्ष आहेत.

मग धर्मनिरपेक्षतेची व्याख्या फक्त धर्माच्या संदर्भाने आणि तीही नकारात्मक पद्धतीने का करावी? याचे उत्तर शतकानुशतके चालत आलेल्या धार्मिक आचारांमधून देता येईल. जुन्या काळात, विज्ञान अविकसित असता, 'धार्मिक असणे' हीच सर्व-प्रचलित, सामान्य जीवनाची पद्धत होती, आणि त्याला पर्याय फारच क्वचित होता. विज्ञानाची स्पर्धा नसताना, लोकांच्या आचारविचारांचा मापदंड तोपर्यंत धर्मच होता. आज आपल्याला विज्ञानाची साथ आहे.

धर्मनिरपेक्षतेची सकारात्मक व्याख्या शोधायला शब्दाच्या उगमाकडे जावे लागेल. ऐतिहासिकदृष्ट्या *secular* या शब्दाचा धर्माशी संबंध नव्हता. लॅटिनमध्ये हा एक स्वतंत्र शब्द होता, जो 'या विश्वाचे' उपक्रम दर्शवत असे. संस्कृतमध्ये याला "लौकिक" किंवा "ऐहिक" म्हटले जाईल. त्याच्या उलट धर्मांचा संबंध "अलौकिक" किंवा "पारलौकिक" गोष्टींशी आहे. ख्रिश्चन आणि इस्लाम धर्मात "इतर दुनिया" म्हणजे स्वर्ग आणि नर्क. हिंदूही स्वर्गलोक/ पाताललोक वर विश्वास ठेवतात, जिथे 'देव-दानव वावरतात'. कर्मावर आधारित पुनर्जन्माची संकल्पना सुद्धा हिंदूंच्या पारलौकिक श्रद्धेचा एक भाग आहेच.

धर्मनिरपेक्षतेचा धर्माशी अंतर एवढ्यापुरता आहे, की आपण नागरिक आपल्या परस्पर संबंधात "या जगाच्या" गोष्टींमध्ये रमतो की "इतर जगाच्या" गोष्टींमध्ये. धर्मनिरपेक्ष समाजासाठी फक्त 'या' पृथ्वीवरील व्यवहार, म्हणजे फक्त 'हे' जग महत्त्वाचे आहे. जरी धर्म मानणारे मानत असले किंवा विज्ञानकथालेखक कल्पना करत असले, तरी इतर कोणत्याही जगाच्या अस्तित्वाचे पुरावे आढळत नाहीत. म्हणूनच आपल्या शालेय पुस्तकांत 'इतर जग'—स्वर्गलोक/ पाताललोक/ देव-दानव—यांना स्थान नाही. म्हणून धर्मनिरपेक्ष व्यक्तींसाठी धर्मांविषयी वाद घालणे ही निरर्थक बाब आहे. पुराव्यावर आधारित ज्ञानाशी विसंगत असलेल्या बाबींशी धर्मनिरपेक्ष व्यक्तीचा काही संबंध नाही. तेंव्हा धर्म हा एक श्रद्धेचा, खाजगी विषय असून सांस्कृतिक ओळखीच्या पलीकडे त्याचा भारतीय नागरी जीवनाशी काहीएक संबंध नाही. हीच घटनेची मूळ मान्यता आहे. सार्वजनिक जीवनात, रस्त्यावर आलेल्या धर्मामुळे सांस्कृतिक बंधुत्व धोक्यात येत असेल, तर सर्वांनी आप-आपला धर्म आपल्या घरी घेऊन जाणेच योग्य होईल.

सरकार मध्ये मात्र (धार्मिक मान्यतेच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यापलीकडे) धर्माला जागा नाही. तेथे धर्मनिरपेक्षतेची एक सकारात्मक व्याख्या "तर्काधिष्ठित जीवन" अशी होऊ शकते. तार्किक विज्ञानवृत्ती हा भारतीय घटनेचा खरा मंत्र आहे. धर्मनिरपेक्ष राज्य (किंवा व्यक्ती) तर्काशी सुसंगत असतील त्यांच गोष्टींचा पुरस्कार करेल. नक्कीच, एखाद्यावेळेस तर्क चुकू शकते – अपुरी माहिती असल्यामुळे म्हणा, किंवा चुकीच्या गृहितकामुळे.

पण एकत्रित ज्ञानाने आणि क्षमतेने त्या तर्काला आपण तपासू शकतो, सुधारू शकतो. राज्य-व्यवस्थेत आपण अलौकिक युक्तिवाद मांडणार नाही, किंवा स्वीकारणार नाही. तार्किक विचारशक्ती, हा निसर्गाचा मानवाला दिलेला अद्वितीय आशीर्वाद आहे, जो व्यक्तिगत आणि सामूहिक भल्यासाठी बहुतेक (आणि जास्त वेळ) चुकीचा ठरत नाही.

***धर्मापलीकडचा धर्म म्हणजेच धर्मनिरपेक्षता.***

या दृष्टिकोनातून बघितले तर जिथे श्रद्धा सत्याशी विसंगत आहे तिथे धार्मिक श्रद्धांना राज्यघटनेने पूर्णपणे नाकारले आहे (उदाहरणार्थ, सती प्रथा). दुसऱ्या शब्दांत म्हणायचे तर, भारतीय राज्यघटनेत धर्म नसला तरी सगळ्याच धर्मांचे तर्कशुद्ध विचार सामील झालेले आहेत. उदाहरणार्थ, “सर्वे सन्तु निरामय:” हा वेदकालीन विचार राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये प्रतिबिंबित होतो; किंबहुना राज्यघटनेत घटना-कॅमेटीने त्याची एक सुस्पष्ट व्याख्या केलेली आहे: “राज्य हे लोकांच्या पोषणाच्या पातळीतील सुधारणा, जीवनमान उंचावणे, आणि सार्वजनिक आरोग्याच्या उन्नतीसाठी कार्य करील”, इत्यादि. म्हणजेच, घटनेत धर्म नाही, पण सर्व धर्मातील तर्कशुद्ध विचार आहेत.

ज्ञान-विज्ञानवर आधारित तर्काचा दिवा लावला की मानव/पृथ्वीच्या विरुद्ध पसरलेला अंधार आपोआपच नाहीसा होतो. रंग, वय, लिंग, लैंगिकता, जाती, धर्म, विचार इत्यादींवर आधारित भेदभाव; तसेच, पर्यावरणाचा ऱ्हास आणि मानवी हक्कांचे उल्लंघन हे सर्व घटनेने नाकारले आहेत. कारण सुखी-आनंदी, समृद्ध, व शांततामय सहजीवनासाठी भेदभाव, पर्यावरणाचा ऱ्हास आणि मानवी हक्कांचे उल्लंघन तर्कसंगत/ विज्ञानसंगत नाहीत.

अशा विचारसरणीचा एक स्वाभाविक निष्कर्ष असा, की धर्मनिरपेक्ष व्यक्तीला धार्मिक व्यक्तींच्या श्रद्धांचा आदर करावाच लागेल – कारण श्रद्धा विचारांचा विषय आहे, व विचारांवर बंधन घालणे म्हणजे विचारस्वातंत्र्यावरच प्रश्नचिन्ह लावणे होय. पण एक अट आहे. जसं इंग्रजीत म्हणतात, “The right to swing my fist ends where the other man’s nose begins”. म्हणजे, माझे स्वातंत्र्य तेवढ्यापुरतेच आहे, जोपर्यंत ते इतरांच्या मर्यादा भंग करत

नाही. प्रत्येकाला धार्मिक/ धर्महीन होण्याचा, धर्म निवडण्याचा व त्याच्या पद्धतीने आचरण करण्याचा मूळ अधिकार आहे, पण यामुळे धर्मनिरपेक्ष हक्कांचे उल्लंघन होता कामा नये.

***विज्ञानवृत्ती हा भारतीय घटनेचा खरा मंत्र आहे.***

पदपथावर व रस्त्यांवर वृद्ध व इतर पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा विचार न करता धार्मिक उपासनेची स्थळे उभी करणे, हे घटनेबाहय कृत्य आहे. एका धर्माला दुसऱ्या धर्माविरुद्ध उभे करणे तर राज्यघटनेचा घोर अपमानच ठरेल. नागरिकाने घटनेबाहय कृत्य केल्यास प्रगतीच्या क्षेपणास्त्राची मार्गदर्शक प्रणाली (Guidance System) निष्फल होईल आणि राष्ट्र कधीच विकसित होणार नाही. खरं तर राज्याचे सार्वजनिक निर्णयच नव्हे, तर नागरिकांचे खाजगी निर्णयसुद्धा वैज्ञानिक आधारावर असावेत. म्हणूनच घटनेच्या अनुच्छेद ५१(अ)(ह) नुसार प्रत्येक नागरिकाने अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि पारंपारिक अकरणीय अशा पद्धतींचा त्याग करणे, आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद व सुधारणा या मूल्यांचा आदर करून त्यांचा व्यक्तिशः विकास करणे राष्ट्रीय विकास करीता अत्यंत महत्वाचे आहे.

भारतीय राज्यघटनेची धर्मनिरपेक्ष तत्वज्ञानावर उभारलेली ही भक्कम पायाभरणी केवळ शासनकारभारापुरती मर्यादित नसून प्रत्येक नागरिकाच्या जीवनव्यूहाशी निगडित आहे. धर्म हा खाजगी श्रद्धेचा विषय आहे; तर सार्वजनिक क्षेत्रातील (खरं तर कुटुंबातसुद्धा) योग्य दिशा ठरविण्यासाठी तर्कशुद्धता, विज्ञानवृत्ती आणि मानवतावादी दृष्टिकोन यांची गरज आहे. म्हणूनच धर्मनिरपेक्षतेला नकारात्मक छटा न देता, 'तार्किक जीवनशैली' म्हणून समजणे आवश्यक आहे. हा दृष्टिकोन स्वीकारला तरच न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य या राज्यघटनेच्या मूल्यांवर आधारलेला भारताचा विकासमार्ग उजळून निघेल. तर्क हीच आपली सामूहिक प्रार्थना, आणि सर्वसमावेशक, शाश्वत (sustainable) विकास हेच आपले लक्ष्य.

[टीप: *लेखक जागतिक संस्था 'द सेक्युलर कम्युनिटी' चे विद्यमान अध्यक्ष आहेत.*]